SUVIJJA printries
आमच्या येथे सर्व प्रकारच्या प्रिंटींगची कामे स्विकारली जातील.
पत्ता - गाळा नं. ३, ए -६८, क्रविना सिन्थेटिक्स कंपाऊंड, रामनाथ सोलार बसस्टॉपच्या मागे, खैरणे एम.आय.डी.सी., टी.टी.सी. इंडस्ट्रियल झोन, खैरणे, नवी मुंबई, ठाणे.
दूरध्वनी क्र. :- ९८३३० ७७८८६, ९८७०१०७६५३.

जनतेचा
# महानायक
www.emahanayak.com

**वाचकांना सूचना**
पुढील विभागातील सर्व वाचकवर्गास कळविण्यात येत की, आपणांस दैनिक 'जनतेचा महानायक' चा अंक नियमित उपलब्ध होत नसल्यास त्या विभागातील प्रतिनिधींशी त्वरित संपर्क साधावा.
मुंबई कार्यालय :०२२-२१०२०५३५

| | | |
|---|---|---|
| मुंबई | संतोष कोठावडे (बापू) | 9867 724 624 |
| | रवी लोहार | 8976 491 054 |
| | जितेंद्र भावे | 9370 246 721 |
| नाशिक | रवि जगताप | 8007 432 298 |
| | बंडू वीर | 9422 034 176 |
| पुणे | अरूण सोनवणे | 9975 702 465 |
| | मालपाणी | 9423 258 806 |
| मनमाड | केशवपाटील | 9028 135 240 |
| | घाटकर | 9860 107 181 |
| इगतपूरी | अरूण जगताप | 9209 261 491 |

वर्ष ५ ▪ अंक २६८ ▪ मुंबई व नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित ▪ मुंबई ▪ मंगळवार, दि. १४ डिसेंबर, २०१० ▪ पृष्ठे ८ ▪ किंमत ₹ २.०० (RNI NO. MAHMAR/2006/23612)

## थोडक्यात...

### मुंबईत पोलीस अधिकाऱ्याची आत्महत्या

**मुंबई/ प्रतिनिधी**

दहिसर विभागातील सहाय्यक पोलीस आयुक्त बी. डी. गायकवाड यांनी आज दुपारी आपल्या कार्यालयात डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. दहिसर पोलीस ठाण्यातील त्यांच्या कार्यालयातच ही घटना घडली असून पोलीस दलात खळबळ माजली आहे. त्यांनी आपल्या रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडल्यानंतर त्यांना एका खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. गायकवाड हे एका बैठकीहून परतल्यानंतर हा प्रकार घडल्याचे बोलले जाते. मात्र, त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही.

### TV9 चा बुध्दांबाबत खोडसाळ सवाल

**मुंबई/ प्रतिनिधी**

टिव्ही ९ या वृत्तवाहिनीने 'रहस्य' या मालिकेत गौतम बुध्दांबाबत खोडसाळ सवाल उपस्थित केल्याने आंबेडकरी जनतेमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. आज सकाळी नऊ वाजता टिव्ही वाहिनीने 'रहस्य' या मालिकेत गौतम बुध्दांबाबत माहिती प्रसारित केली होती. या कार्यक्रमाच्या अखेरीस भगवान बुध्द विष्णू का अवतार है ? असा खोडसाळ सवाल उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत काही जागृत आंबेडकरी कार्यकर्त्यांनी टिव्ही ९ च्या कार्यालयात फोन करून निषेध केला. तथागत बुध्दांनी कर्मकांड, पुनर्जन्म, अवतार अशा बाबी नाकारल्या आहेत. त्यामुळे चॅनेल्सनी तथागतांच्या विचारांचा अभ्यास करूनच कार्यक्रम प्रसारित करावा आणि या प्रकाराबाबत माफी मागावी, अशी मागणी आंबेडकरी जनतेतून होत आहे.

### बुध्दिस्ट रिपब्लिकनची आज विक्रोळीत बैठक

**मुंबई/ प्रतिनिधी**

बुध्दिस्ट रिपब्लिकन या संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक आज सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आली आहे. पंचशील मित्रमंडळ, टागोरनगर, ग्रुप. नं.१, पंचशील बुध्दविहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ विक्रोळी (पूर्व) येथे ही बैठक होईल. बैठकीला संघटनेचे प्रमुख सल्लागार तथा 'महानायक'चे संपादक सुनील खोबरागडे, ॲड. संघराज रूपवते, संघटनेचे अध्यक्ष विवेक मोरे, साहित्यिका प्रा. आशालता कांबळे, जलाशय सोशल नेटवर्कचे अध्यक्ष संतोष पगारे आदी मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीस मुंबई, ठाणे परिसरातील बौध्द युवक, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८१९५२७०१० या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

### रिपब्लिकन पँथर्सची विधानसभेवर धडक

**नागपूर/ प्रतिनिधी**

रिपब्लिकन पँथर्सचे संस्थापक पँथर श्यामदादा गायकवाड यांच्या नेतृत्वात दलित, पीडित, शोषित, मजदूर, शेतकरी, कामगार व बहुजन समाजाच्या विविध समस्यांच्या मुद्यावर हिवाळी अधिवेशनात विधानसभेवर धडक मोर्चा काढण्यात आला. त्यात हजारोंच्या संख्येने स्त्री-पुरुष सहभागी झाले होते. मोर्चाला टेकडी रोड टी. पॉईट येथे अडविण्यात आले. याठिकाणी झालेल्या सभेत राज्य सरकारच्या बहुजन विरोधी धोरणांचा निषेध करण्यात आला. दलितांवर होत असलेले अत्याचार, सेझच्या नितीचा विरोध, नागपूर येथे प्रलंबित डॉ. आंबेडकर स्मारकाचा प्रश्न आदी प्रश्नांकडे यावेळी लक्ष वेधण्यात आले.



मित्रांनो,गेली २३ दिवस आपण हिवाळी अधिवेशनात असहकार्य करुन सरकारशी लढा दिला.आता दोन मिनिटांसाठी अधिवेशनाला श्रध्दांजली वाहू.

# गांधी नव्हे, बाबासाहेबच शांततेचे प्रतीक




▪ कर्नल जी. बी. सिंग यांचे प्रतिपादन ▪ अमेरिकेतील परिसंवादात गांधींचा मुखवटा फाडला



**मिशीगन/ महेश वासनिक**

**स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मोहनदास गांधींपेक्षा बाबासाहेबांनी समाजाच्या उत्थानासाठी मोलाचे कार्य केले असून तेच खरे शांततेचे प्रतीक आहेत, असे प्रतिपादन करतानाच अमेरिकन लष्कराचे निवृत्त कर्नल जी. बी. सिंग यांनी गांधींचा खरा चेहरा उघडा पाडला. अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठाच्या आवारातील गांधींचा पुतळा हटविण्याच्या मागणीसंदर्भात 'आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका' या संघटनेने मिशीगन विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या परिसंवादात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.**



मिशीगन विद्यापीठाच्या आवारात झालेल्या या परिसंवादात विद्यापीठाच्या प्रतिनिधींसह सुमारे ६० जण उपस्थित होते. कर्नल जी. बी. सिंग यांनी पॉवर पॉईंटच्या साह्याने उपस्थितांसमोर 'खरा' गांधी सादर केला. गांधींनी अश्वेतवर्णीयांविरोधात भारतीयांना चिथावणी दिली होती. तसेच दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्याच्या काळात गांधींनी दबरन पोस्ट कार्यालयात भारतीयांना वापरण्यासाठी तिसरे प्रवेशद्वार मागून घेतले. अश्वेतवर्णीय वापरत असलेले प्रवेशद्वार वापरणे आपल्या वंशीय सन्मानाला योग्य नसल्याचे गांधींना वाटत होते, असे आरोप तब्बल २७ वर्षे गांधींचा टिकात्मक अभ्यास करण्यात खर्ची घातलेल्या सिंग यांनी केला.

'बिहाइन्ड द मास्क ऑफ डीव्हीनिटी' आणि गांधी-अंडर द क्रॉस एक्झामिनेशन' या दोन पुस्तकांचे लेखक असलेल्या सिंग यांनी या परिसंवादात गांधीचा वंशवादी चेहरा मिशीगन विद्यापीठाच्या प्रतिनिधींसमोर आणला.

सिंग यांच्या सादरीकरणानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले. या सत्रात 'जेनिसेस कौंटी'च्या एलिझाबेथ यांनी मिशीगन विद्यापीठ आवारात गांधींचा पुतळा उभारण्यात आल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. संबंधित व्यक्ती वादग्रस्त असेल अशा कोणाचाही पुतळा तेथे बसविण्यात येऊ नये, असे एलिझाबेथ यांनी सांगितले. त्यावेळी गांधींचा पुतळा हा भेट म्हणून मिळाला असल्याचे 'युनिर्व्हसिटी रिलेशन'च्या संचालिका जेनिफर हॉगन यांनी सांगितले. त्यावर ही भेट कुणी दिली यासंबंधी जेनिसेस कौंटी, फ्लिंटचे महापौर कार्यालय, विद्यापीठ संचालक आदींकडे चौकशी केली परंतु, कुणीही समाधानकारक उत्तर दिलेले नसल्याचे आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका' या संघटनेचे प्रतिनिधी महेश वासनिक यांनी नमूद केले. यावेळी सुरेंद्र वानखेडे, विद्यापीठाच्या आफ्रिकन-अमेरिकन विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी, अनुरंगम राजू, सशांक वैद्य, मार्तंड वरदे, आनंद बेली, मनोहर कोछे आदींनी आपले विचार मांडले. यावेळी बाबासाहेबांच्या 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'चे वाटप करण्यात आले. गांधींची पाच वेळा शांततेच्या नोबेल पारितोषिकासाठी शिफारस करण्यात आली होती. परंतु, पाचही वेळा नोबेल निवड समितीने त्यांना पुरस्कार देण्यास नकार दिला होता, याकडे सशांक वैद्य यांनी यावेळी लक्ष वेधले. परिसंवादाच्या सुरूवातीला विद्यापीठाच्या 'डायर्व्हसिटी कौन्सिल' विभागाच्या प्रा. टेंडजी गेंजस यांनी प्रस्तावना केली. 'आंबेडकर मिशन'चे आनंद बेली यांनी उपस्थितांना जी. बी. सिंग यांची ओळख करून दिली. तर महेश वासनिक यांनी आभार प्रदर्शन केले. मिशीगन विद्यापीठ गांधींचा पुतळा हटविण्यासंबंधी पावले उचलील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## कुपोषण निर्मूलनासाठी कालबध्द कार्यक्रमाची गरज

**अमरावती/ प्रतिनिधी**

मेळघाटमधील कुपोषण निर्मूलनापासून विकासाचे विविध प्रश्न निश्चितपणे मार्गी लागतील, असा विश्वास मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी धारण येथील सभेत व्यक्त केला. मेळघाट परिसरातील नागरिकांच्या समस्या समक्ष भेटीत जाणून घेतल्यानंतर आदिवासी मेळाव्यात मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री म्हणाले,कुपोषण निर्मूलनासाठी कालबध्द कार्यक्रमाची गरज आहे. गरोदर माता, नवजात बालकांना आहार, वेळेवर औषधोपचार आणि पुरेसा आहार देण्याकडे लक्ष द्यावे लागेल. या उपाययोजनांमुळे कुपोषणाचा दर कमी झालेला दिसून येईल, असे ते म्हणाले.



## मक्का मस्जिद स्फोट प्रकरणी आरोपपत्र

**हैदराबाद/ वृत्तसंस्था**

मक्का-मस्जिद बॉम्बस्फोट प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआयने) आज देवेंद्र गुप्ता आणि लोकेश शर्मा यांच्याविरूध्द आरोपपत्र दाखल केले. हैदराबाद येथील १४ व्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे हे ८० पानी आरोपपत्र सादर करण्यात आले.

देवेंद्र गुप्ता आणि लोकेश शर्मा या आरोपींना जून महिन्यात अटक करण्यात आली असून ते अजमेर बॉम्बस्फोट प्रकरणातही आरोपी आहेत. मक्का-मस्जिद बाम्बस्फोट प्रकरणी स्वामी असिमानंद याला हरिद्वार येथून अटक करण्यात आली आहे. या सर्व आरोपींची चौकशी सुरू असून फरारी आरोपींचाही शोध सुरू आहे, असे सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हैदराबादेतील मक्का मस्जिदजवळ १८ मे २००७ रोजी बॉम्बस्फोट घडविण्यात आला होता. त्यात १४ जण ठार झाले होते.

## संसदेचे हिवाळी अधिवेशन कोरडेच



- संसदीय इतिहासात लाजिरवाणा विक्रम
- जनतेचे १५४ कोटी रुपये पाण्यात
- सत्ताधारी व विरोधकांच्या दुराग्रहाचा परिणाम
- दोघेही आरोप -प्रत्यारोपात मश्गुल

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था**

दुराग्रही विरोधक आणि आडमुठे सरकार यामुळे संसदेचे हिवाळी अधिवेशन कोरडेच गेले. कोणत्याही महत्वाच्या विषयावर चर्चा न होता दररोज गदारोळ होऊन तब्बल २२ दिवस कामकाज तहकूब ठेवणारे देशाच्या संसदीय इतिहासातील हे पहिलेच अधिवेशन ठरले आहे. यावर कडी म्हणजे अधिवेशन कोरडे ठेवण्याची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नसून विरोधक आणि सत्ताधारी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांमध्ये मश्गुल झाले आहेत.

संसदेचे हिवाळी अधिवेशन ९ नोव्हेंबर रोजी सुरू झाले आणि दुसऱ्याच दिवसापासून टू-जी स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रकुल स्पर्धा आणि आदर्श सोसायटी या घोटाळ्यांच्या मुद्यावरून संसदेत अभूतपूर्व गदारोळ झाला. हे तिन्ही घोटाळे सरकारची डोकेदुखी ठरणार असल्याची कल्पना यूपीए सरकारला आधीच होती. त्यामुळे संबंधितांना राजीनामे देण्यास सांगून यूपीएने विरोधकांचा विरोधाची धार बोथट करण्याचा प्रयत्न केला. परंतु, टू-जी स्पेक्ट्रम प्रकरणी संयुक्त संसदीय समिती स्थापन करण्याची मागणी विरोधकांनी कायम ठेवली.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसापासूनच विरोधकांनी ही मागणी रेटून धरली. परंतु, ही मागणी फेटाळून संसदेतील कोंडी फोडण्यासाठी यूपीएने तीन सर्वपक्षीय बैठका घेतल्या. विरोधकांच्या दुराग्रहामुळे या सर्व बैठका निष्फळ ठरल्या. त्यानंतरही यूपीएने जेपीसीची स्थापन न करण्याची आडमुठी भूमिका कायम ठेवल्याने हिवाळी अधिवेशन वाया जाणार असल्याची चिन्हे दिसत होती. आजच्या अखेरच्या दिवशीही याच मुद्यावरून गदारोळ होऊन सलग २२ व्या दिवशी संसदेचे कामकाज तहकूब झाले.

हे अधिवेशन कोरडे गेल्याने जनतेचे १५४ कोटी रूपये वाया गेले आहेत. मात्र, त्याचे कोणतेही सोयरसुतक नसलेल्या विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडण्यात धन्यता मानली आहे. अर्थमंत्री प्रणव मुखर्जी आणि संसदीय कार्यमंत्री पवनकुमार बन्सल यांनी संसदेचे अधिवेशन वाया जाण्यास विरोधक जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

